**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**(अर्थसंकल्पीय विशेष सभा)**

मंगळवार,दि.२४.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा.अ.सत्तार अ.गफुर.महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| चव्हाण आनंद शंकरराव | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| स्वामी शैजला किशोर | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| फारुख अली खा इलियाज खॉ | अंजुम बेगम शेख अफरोज |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | आनेवार गंगासागर संदीप |
| भवरे किशोर दामोधर | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| मुदिराज कमलाबाई रामस्वामी | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजियाबेगम अयुबखान | गाडगे शंकर जयवंतराव |
| देशमूख वैशाली मिलिंद | गायकवाड अंजली सुरेशराव |
| देशमूख बालासाहेब गंगाधराव | स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन |
| गफारखान गुलाम महमंद खान | धबाळे गणपतराव भिवाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | ज्योती महेंद्र खेडकर |
| नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | बिपाशा बेगम स.वलिवोध्दीन |
| अ.फसीया बेगम फिरदोस | आसीयाबेगम अ.हबीब बागवान |
| स.शेर अली स.महेबुब अली | कुरेशी चॉदपाशा खाजा |
| तेहसीन बेगम अ.समद | फारुख हुसेन कासिम साब |
| कोकुंलवार लक्ष्मीबाई राखेवार | राखेवार सतिष शेषप्पा |
| कुरेशी शफी अहेमद | चाऊस हसीना बेगम साबेर |
| अ.लतिफ अ.मजीद | जकिया बेगम स.मुखतार |
| गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल | खोमणे सुदर्शना महेश |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | किशोर यादव |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला गजानन | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| सौ.ललिता मुंकुंदरा बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजीराव |
| येवनकर विजय हिराचंद | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.श्री अ.सत्तार अ.गफुर ,महापौर हे होते तसेच श्री सुशील खोडवेकर आयुक्त,श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, प्रशासन,श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री आलुरकर, स.संचालक, नगररचना.श्री विजय मुंढे, स.आयुक्त, आरोग्य, श्री गिरीष कदम, अभियता. श्री अंधारे, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातील नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर.** स्थायी समितीची सभापती श्री विनय पाटील गिरडे, आयुक्त, सर्व स.सदस्य, अधिकारी कर्मचा-याचे स्वागत करुन आजच्या अंदाजपत्रकीय विशेष सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

| | |
|---|---|
| **अशोक उमरेकर** | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे पशु वैद्यकिय अधिकारी श्री रईसोध्दीन याचे वडील अहेमोध्दीन यांचे नुकतेच –हदय विकाराने दुःखद निधन झाले असल्यामूळे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. |
| **गफार खान** | या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे तसेच महाराष्ट राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ,राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ नेते आर.आर.पाटील (आबा) यांचेही दुःखद निधन झाल्यामूळे त्यांना तसेच खुदवईनगर भागातील घरास आग लागून घरातील नवरा बायको व त्यांची दोन मुले जळुन मृत पावली त्यानाही भावपुर्ण श्रदांजली अर्पण करण्यात यावी. |
| **सरजितसिंघ गिल** | महाराष्ट राज्याचे माजी गृहमंत्री आर.आर.पाटील यांचे दुःखद निधन झाल्यामुळे त्यांना भावपुर्ण श्रदांजली अर्पण करण्यात यावी. |
| **महापौर** | सामाजिक कार्यकर्ते अहेमोध्दीन, माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, व खुदवईनगर येथील घरास आग लागून त्या मृतपावलेल्या व्यक्तीना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. |

**ठराव क्र. १६८** **ठराव**

नांवामनपाकेतील पशु वैद्यकिय अधिकारी श्री रइसोध्दीन यांचे वडील अहेमोध्दीन यांचे नुकतेच –हदय विकाराच्या तिवृ झटक्याने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपाकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र. १६९** **ठराव**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व राष्टवादी पक्षाचे जेष्ठ नेते आर.आर.पाटील,(आबा) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपाकेची सर्वसाधारण् सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र. १७०** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र.२६ खुदवईनगर येथील नागरीकाचे घरास आग लागून या आगीमध्ये त्यांचे तसेच त्यांची पत्नी, व लहान दोन मुलांचा मृत्यू झाला असल्यामूळे त्यांना ही नांवामनपाकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

| | |
|---|---|
| **रामनारायणजी काबरा** | सर्वसाधारणसभेत स.सदस्यांना बोलण्यासाठी टेबलवर स्वतंत्र माईकची व्यवस्था करण्यात आली होती नंतर ते माईक काढून घेण्यात आले त्यामूळे स.सदस्यांना आपले प्रश्न मांडण्यास त्रास होत आहे. माईक शोभेसाठी लावण्यात आलेले होते काय याचा खुलासा करण्यात यावा. |
| **गफार खान** | प्रत्येक स.सदस्यांचे टेबलावर माईकची व्यवस्था होती नंतर ती व्यवव्स्था का काढून टाकण्यात आली यास कोण जबाबदार आहे याची विभागिय चौकशी करुन संबंधिता विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. |
| **दिपकिंसह रावत** | महाराष्ट्र शासनाने नांवामनपाकेचे जेष्ठ सदस्य श्री सरजितसिंघ गिल यांची श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी नियुक्ती केली त्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात यावे. |
| **गफार खान** | महाराष्ट्र शासनाने राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री अशोकरावजी चव्हाण यांच्या शिफारशीनूसार नांवामनपाकेचे जेष्ठ, अनुभवी कॅपेबल सदस्य श्री सरजितसिंघ गिल यांची श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर, नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी नियुक्ती केली त्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात यावे. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेचे जेष्ठ सदस्य श्री सरजितसिंध गिल यांची श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी नियुक्ती केली ही बाब महानगरपालिकेच्या दृष्टीने भूषणास्पद आहे, श्री गिल हे यापुर्वीही बोर्डाचे सदस्य होते त्यांनी त्यावेळी चांगले काम केलेले असल्यामूळे त्यांच्या कामांचा अनूभव, कार्यक्षमता लक्षात घेवून शासनाने त्याची सदसय पदी नियुक्ती केलेली आहे. श्री गिल महानगरपालिकेचे सदस्य असल्यामूळे ते गुरुव्दारा बोर्डाच्या बैठकीत महानगरपालिकेची व महानगरपालिकेच्या<br>सभेत गुरुव्दारा बोर्डाची बाजु मांडून बोर्ड व महानगरपालिका दुवा म्हणून काम करतील, त्याचे अभिनंदनाचा प्रस्ताव एकमताने पास करण्यात यावा. |
| **अंजली गायकवाड** | श्री सरजितसिंघ गिल याची श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी नियुक्ती झाल्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात यावे. |

**सरजितसिंघ गिल** श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी माझी नियुक्ती झाल्याबध्दल श्री दिपकसिंह रावत ,श्री गफार खान व सभागृह नेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला त्याबध्दल मी त्याचे आभार मानतो. महाराष्ट्र शासनाने चौदा वर्षानंतर श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाचे गठन केले आहे. जिल्हयाचे लोकप्रिय नेते माजी खासदार श्री भास्कररावजी पाटील खतगांवकर यांनी केलेल्या शिफारशीनुसार राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री देवेंद्रजी फडणवीसजी ,महसुल मंत्री मा.ना.श्री एकनाथराव खडसेजी,भाजप प्रदेशाध्यक्ष व खा.श्री रावसाहेब दानवेजी यांनी श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर, नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी माझी नियुक्ती केली त्याबदल मी त्यांचेही आभार व्यक्त करतो. गुरुव्दारा बोर्डावर सदस्य म्हणून काम करीत असतांना गुरुव्दारा बोर्ड व महानगरपालिका यांचेतील दुवा म्हणून मी करील यात शंका नाही.सभागृहाने माझे अभिनंदन केले त्याबदल सभागृहाचा मी आभारी आहे.

**महापौर** गुरुव्दारा बोर्ड हा धार्मीक बोर्ड असून त्यामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा हितसंबध नाही.शासनाने श्री सरजितसिंध गिल यांचे सामाजिक व धार्मीक कार्य,अनुभव लक्षात घेवून श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी नियुक्ती केली हे अभिमानास्पद आहे.त्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्याचा प्रस्ताव पारीत करण्यात येतो.

**ठराव क्र. १७१** **ठराव**

महाराष्ट्र शासनाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे जेष्ठ सदस्य सरजितसिंध गिल यांचे सामाजिक ,धार्मीक कार्य, व यापुर्वी गुरुव्दारा बोर्डावर सदस्य म्हणून केलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेवून त्यांची श्री सचखंड हजुर साहिब अबचलनगर नांदेड बोर्डाच्या सदस्य पदी नियुक्ती केली ही बाब नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेला भुषणास्पद असून ते गुरुव्दारा बोर्डाच्या बैठकीत महानगरपालिकेची व महानगरपालिकेच्या सभेत गुरुव्दारा बोर्डाची बाजु मांडून बोर्ड व महानगरपालिका दुवा म्हणून काम करतील अशी अपेक्षा बाळगुन त्यांचे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची विशेष सभा सर्वानुमते अभिंनदन करते.

**अनुजा तेहरा** नुकत्याच प्रभाग क्र.१२ (ब) शिवाजीनगर करीता झालेल्या पोट निवडणूकीत राष्ट्रीय कॉंग्रेसचे उमेदवार श्री उमेशसिंह चव्हाण हे प्रचंड मताने निवडून आले असल्यामूळे त्याचे अभिनंदनाचा प्रस्ताव मी मांडत आहे त्यास सभागृहाने मान्यता द्यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री उमेश चव्हाण यांचे अभिनंदनाच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** प्रभाग क्र.१२ (ब) शिवाजीनगर करीता झालेल्या पोट निवडणूकीत राष्ट्रीय कॉंग्रेसचे उमेदवार श्री उमेशसिंह चव्हाण हे प्रचंड मताने निवडून आले त्यबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव क्र. १७२** **ठराव**

नुकत्याच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१२ (ब) शिवाजीनगर करीता झालेल्या पोट निवडणूकीत राष्ट्रीय कॉंग्रेसचे उमेदवार श्री उमेशसिंह चव्हाण हे प्रचंड मताने निवडून आले त्याबध्दल त्यांचे हि नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**महापौर** भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष डॉ श्री धनाजीराव देशमुख यांनी केलेल्या शिफारशीनूसार श्री अभिषेक सौदे यांना नांवामनपाकेत भारतीय जनता पार्टीचे गटनेते म्हणून मान्यता देण्यात आली त्याची सभागृहाने नोद घ्यावी,श्री अभिषेक सौदे यांचे अभिनंदन करुन त्यांचे स्वागत करण्यात येते.

**ठराव क्र. १७३** **ठराव**

नांवामनपाकेचे सदस्य श्री अभिषेक सौदे यांना नांवामनपाकेत भारतीय जनता पार्टीचे गटनेते म्हणून मान्यता देण्यात आली नोंद घेवून श्री अभिषेक सौदे यांचे हि नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**स.शेर अली** हैदरबाग दवाखाना कोंडवाडा म्हणून व देगलुर नाका चौक कब्रस्थान म्हणून घोषित करण्यात यावा अशी मागणी आम्ही करत आहोत ,

(एमआयएमचे सर्व सदस्यानी हातात फलक घेवून महापौरांच्या टेबलासमोर बसून धरणे धरली.)

**महापौर** एमआयएमच्या सदस्यांनी संविधानिक पध्दतीने आपल्या जागेवर जावून आपले प्रभागातील विकासाचे प्रश्न मांडावे महापौरांच्या समोर धरणे योग्य नाही .सदस्यांनी आपल्या जागेवर जावून आपले प्रश्न मांडावे.

**स.शेर अली** गुरु ता गध्दी २००८ अंतर्गत हैदरबाग येथे गरीब अल्पसंख्याक नागरीकासाठी दिडकोटी रुपये खर्च करुन मॅटरनिटि दवाखान्याचे इमारतीचे बांधकाम करण्यात आले परतु अद्याप दवाखाना सुरु करण्यात आलेला नाही या दवाखान्याच्या परिसरात मोकाट जनावरे फिरत आहे हा दवाखाना सुरु

होणार आहे किंवा नाही. देगलुर नाका ते इदगाह अनेक दिवसापासुन खोदुन ठेवलेला आहे या रस्त्याचे काम कधी पुर्ण होणार याचा खुलासा करण्यात यावा.

**अल केसरी हसन** देगलुर नाका रस्त्याचे काम पुर्ण का करण्यात येत नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**स.शेर अली** जून्या नांदेड शहरात एकादी आग लागल्यास वेळेवर अग्नीशमन वाहने वेळेवर येत नसल्यामूळे आगीचे प्रमाण वाढून नागरीकांची जिवित हानी होत आहे. आठ दिवसापुवी एका घरास आग लागून एकाचा घरातील ३ व्यक्तीचा मृत्यू झाला आहे त्यामूळे जून्या नांदेड शहरात अग्नीशमन केंद्र सुरु करण्यात यावे.

**आयुक्त** देगलूर नाका रस्त्याची मी तीन वेळेस पाहणी केली ,पोलिस अधिक्षकांशी चर्चा केलेली आहे,रस्त्याचे कामासाठी काही तांत्रिक अडचणी येत आहे. पाणी पुरवठा पाईप लाईन दुरुस्तीची काम अगोदर पुर्ण करणे आवश्यक आहे ,पाईप लाईन दुरुस्तीचे काम पुर्ण करुन करुन रस्ताचे काम त्वरीत सुरु करण्यात येईल.

**विनय गुर्रम** दवाखाना व अग्नीशमन केंद्र सुरु करण्यास काय अडचण आहे.

**आयुक्त** खुदवईनगर, हैदरबाग,देगलुर नाका याभागात जवळपास एक लाख लोकसंख्या आहे याभागासाठी दवाखाना आवश्यक असून.महानगरपालिकेचे आवश्यक तो कर्मचारी वर्ग नाही. या दवाखान्याकरीता लागणारे विविध प आपणास विविध पदाची निर्मिती करावी लागणार आहे.

**स.शेर अली** महानगरपालिकेकडून शासनाकडून दवाखाना सुरु करणे शक्य नसेल तर एनजीओ कडून सुरु करण्यात यावा.

**महापौर** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचे गट नेते म्हणून श्री अभिषेक सौदे यांना मान्यता देण्यात आली त्याचे अभिनंदन करण्यात येते.

( मा. महापौर यांनी भारतीय जनता पक्षाचे गट नेते श्री अभिषेक सौदे यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे अभिनंदन केले.)

**डॉ .करुणा जमदाडे** आठ दिवसापुर्वी महिला व कल्याण समितीचे सभापती ,उपसभापती व समितीचे सदस्यांनी सकाळी ११.३० वा हैदरबाग येथील दवाखान्यास भेट दिली असता दवाखान्यात एकाही कर्मचारी उपस्थित नव्हते , वैद्यकिय अधिकारीही अधिकारी उपस्थित नव्हते.

**रजिया बेगम** हैदरबाग दवाखान्यात आम्ही भेट दिली त्यावेळी वैद्यकिय अधिका-यासह इतर कोणतेच कर्मचारी उपस्थित नव्हते त्याचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

**महापौर** मुख्य वेद्यकिय अधिका-यानी दवखानयात अनुपसिथत असलेल्या सर्व कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी

**फारुख अली खा** २००८ ला गुरु ता गध्दी अंतर्गत या दवाखान्याचे काम पुर्ण करण्यात आले आठ वर्ष होवूनही आज पर्यत दवाखाना सुरु झालेला नाही. या दवाखान्याकरीता लागणारे विविध वैद्यकिय साहित्य ,मशिनरीज खरेदी करण्यात आलेले असून ते आज धुळखात पडलेली आहे तीचा काही उपयोग होत नसेल तर भंगारमध्ये विकण्यात यावी .शासन दवाखाना सुरु करीत नसेल तर हा दवाखाना चालू करण्यात येणार नाही काय ,किती दिवस शासनाची वाट पहावयाची

**महापौर** हैदरबाग येथील दवाखाना शासनामार्फत चालविण्यासाठी सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे परंतु त्यावर अद्याप अमलबजावणी झालेली नाही.श्री शेर अली यांनीही याबाबत दोन वेळेस सर्वसाधारण सभेत प्रसताव मांडला होता. आयुक्तांनी निर्णय धेण्याचा अधिकार आहे त्यांनी लवकर निर्णय ध्यावा.

**आयुक्त** सौ.जमदाडे मॅडम यांनी हैदरबाग येथील दवाखान्यात वै. अधिकरारी व इतर कर्मचारी उपसिथत नसल्याची तक्रार केलेली आहे. संबंधिताना कारणे दाखवा नोटीस देवून नियमाणे त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

**दिपकसिंह रावत** शिवसेना पक्षाचे वतीने ८ मार्च रोजी शिवजयंती साजरी करण्याच्या निमित्याने आदल्या दिवशी शिवाजीनगर भागात शिवजयंतीचे पोस्टर लावण्यात आले होते परंतु प्रभारी क्षेत्रिय अधिका-यांनी ते पोस्टर का काढले यांचे स्पष्टीकरण आयुक्त साहेबांनी यावे.क्षेत्रिय अधिका-यांना पोस्टर काढण्यासाठी आयुक्तांचे काही आदेश होते काय श्री शिवाजी डहाळे हे क्रिकेट कोच असतांना त्यांना असे पोस्टर काढण्याचे अधिकार आहेत काय ते क्रिकेट कोच असतांना त्याना नियमाप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी यापदावर काम पाहण्याचे आदेश देता येतात काय धार्मीक कार्यक्रमाचे थोर पुरुषांच्या जयंतीचे पोस्टरला कोणत्याही प्रकारचा जाहिरात कर आकारण्यात येवू नये असा सर्वसाधारण सभेचा ठराव आहे त्यानुसार पोस्टर लावण्यात आले होते. १४ एप्रिलला भिम जयंती आहे त्यावेळेसही अशीच कार्यवाही करण्यात येणार आहे काय

| | |
|---|---|
| **प्रमोद खेडकर** | श्री शिवाजी डहाळे यांची नेमणूक ही क्रिकेट कोच म्हणून झालेली असून ते तांत्रिक स्वरुपाचे पद आहे असे असतांना त्यांना अतांत्रिक क्षेत्रिय अधिकारी म्हणून काम करण्याचे आदेश देता येते काय .याचा खुलासा करण्यात यावा. |
| **सरजितसिंघ गिल** | छत्रपती शिवाजी महाराज यांचे बध्दल आम्हाला नितांत आदर आहे. जाहिरात बॉनर लावण्याचे संदर्भात महापौर श्री अ.सत्तार यांचे अध्यक्षते खाली बैठक झाली होती त्यावेळी धार्मीक कार्यक्रमाचे व राष्टपुरुषांच्या जयंत्या निमित्य रितसर परवानगी घेवून विना शुल्क फलक बॅनर लावण्याचा निर्णय घेण्यात आला होता त्यानिर्णयास सभागृहाने मान्यता दिलेली आहे याबाबत काही शंका असेल तर महापौर आयुक्त यांना विचारावे ते उत्तर देतील. |
| **विनय गुर्रम** | ज्या क्षेत्रिय अधिका-यांनी शिवजयंतीचे बॅनर काढले त्या अधिका-या विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. |
| **दिपकसिंह रावत** | आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान होवू देणार नाही. सर्वसाधारण सभेने जो ठराव केला होता त्याचे भान ठेवावयास पाहिजे. फलक काढावयाचा होता तर शिवसेनेचे नगरसेवक, आमदार, जिल्हा प्रमूख यांना फोन करुन याची कल्पणा देवून काढावयास पाहिजे होती. शिवसेना पक्षाचे वतीने साजरी करण्यात येणा-या शिवजयंतीचे फलक काढण्यात येते इतर पक्षाचेवतीने साजरी करण्यात येत असलेल्या शिव जयंतीचे फलक काढण्यत येत नाही .शिवाजीनगर भागात इतर पक्षाचे फलक होते ते का काढण्यात आलेले नाही. फक्त शिवसेनेचेच फलक का काढण्यात आले. याचा खुलासा करण्यात यावा. |
| **अशोक उमरेकर** | शिवसेनेचे बॅनर काढले त्यावेळी त्यांचे बाजूला खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेबाचे बॅनर होते. |
| **उमेशसिंह चव्हाण** | सभागृहाची दिशाभूल करण्याची गरज नाही.या सभागृहात खा.श्री अशोकरावजी चव्हाण याचे नाव घेण्याची गरज नाही, कारण नियामाप्रमाणे रितसर परवानगी घेवून फलक लावण्यात आलेला आहे. आ. श्री हेमंत पाटील याचे नांवाचा जो फलक लावण्यात आला होता तो रितसर परवानगी घेवून लावण्यात आला होता काय याचा खुलासा करण्यात यावा. |
| **प्रमोद खेडकर** | बॅनर बाबत आयुक्तांनी खुलासा सादर करावा. |
| **महापौर** | क्षेत्रिय अधिकारी मागील सात आठ वर्षापासुन एकाच क्षेत्रिय कार्यालयात काम करीत असतात त्वरीत बदल्या करण्यात याव्यात. रमजान सणाच्या निमित्याने लावण्यात आलेले बॅनर सुध्दा क्षेत्रिय अधिका-यांने काढुन टाकले होते. कोंणाच्या भावना दुखवण्यात येत असेल तर संबंधित अधिका-याविरुध्द कार्यवाही करण्यात यावी. चुकीच्या जागेवर बॅनर लावण्यात आले असेल तर संबंधितांना फलक काढण्यासाठी व तो योग्य जागेवर लावण्यासाठी कळविण्यात यावे. |
| **आयुक्त** | मा.महापौरांनी सुचविल्यानुसार लवकरच सर्व क्षेत्रिय अधिकारी यांच्या बदल्या करण्यात येतील. पाणी पुरवठा का.अभियंत्याची बदली झाल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात मनपा अभियंत्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला. महानगरपालिकेकडे अधिकारी व अभियंत्याची संख्या कमी असल्यामुळे अतिरिक्त पदभार देण्यात येत आहेत. आकृतीबंधानुसार रिक्त पदावर नेमणुका करण्याची कार्यवाही करण्यात येईल. जाहिरात फलकाच्या बाबतीत यापुढे सुप्रिम कोर्टाचे आदेश, राज्य शासनाचे आदेश, महानगरपालिका अधिनियमातील तरतुद व महानगरपालिकेचा ठराव या सर्व बाबीचा आदर करुन बॅनर काढणेच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. शिवसेना पक्षाचे बॅनर चुकीने काढण्यात आले त्याबद्दल मी दिलगीरी आपल्या भावनांचा आदर करुन या प्रकरणाची चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईलत |
| **प्रमोद खेडकर** | झोनल अधिका-यांच्या येत्या आठ दिवसात बदल्या करण्यात याव्यात. आयुक्त साहेबांनी शिवसेना भाजप सदस्यांची बैठक घेतली होती, त्यावेळसही आम्ही मागणी केली होती. |
| **बाळासाहेब देशमुख** | स्वच्छता निरिक्षकांच्याही बदल्या करण्यात याव्यात. |
| **नवलकुमार पोकर्णा** | मागील दोन वर्षापुवी मगनपुरा भागातील अतिक्रमण हटवण्याची मागणी केली होती परंतु अद्याप अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही. अतिक्रमण हटाव पथकातील एका चतुर्थश्रेणी कर्मचा-यांनी अनाधिकृत बांधकामांविरुध्द कार्यवाही न करण्यासाठी ५० हजार रु. घेतलेले आहे. याचे माझ्याकडे पुरावे आहेत. संबंधितांविरुध्द काय कार्यवाही करण्यात येत आहे. |
| **संजय मोरे** | महानगरपालिकेत जे इमारत निरिक्षक आहेत ते १० वी १२ वी पास आहेत त्यांना पदोन्नतीने इमारत निरिक्षक पद दिले आहे. या पदावर कनिष्ठ अभियंत्याची नेमणुक करण्यात यावी जेणेकरुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल व अनाधिकृत बांधकामांना आळा बसेल. |
| **प्रमोद खेडकर** | महानगरपालिकेत तांत्रिक पदावर कार्यरत कर्मचा-यांना अतांत्रिक पदावर काम करण्याचे आदेशीत करण्यात आलेले आहे ते चुक आहे त्यांना त्यांच्या मुळ पदावर पाठविण्यात यावे. |

| | |
|---|---|
| **आयुक्त** | स.सदस्यांच्या भावनांचा आदर करुन एक दोन महिण्यात ज्या कर्मचा-यांची नेमणुक ज्या पदावर झालेली आहे त्यांना त्यांच्या मुळ पदावर आणण्यात येईल. |
| **उमेशसिंह चव्हाण** | १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्यामुळे शहरातील सर्व दलित वस्तीतील पथदिवे चालु करण्यात यावे, साफसफाई करण्यात यावी व दिनांक १३-१४ एप्रिल रोजी नियमीत पाणी पुरवठा करण्यात यावा. |
| **अंजली गायकवाड** | धार्मीक व सामाजिक कार्यक्रम नेमके कोणते त सांगा 14 एप्रिलला डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती असून महापुरुषांच्या जयंती निमित्य तीन दिवस बॅनर पोस्टर विना शुल्क लावण्याची परवानगी देण्यास मान्यता देण्यात आली असल्यामूळे तीन दिवस विनाशुल्क आंबेडकर जयंतीचे फलक लावण्यास परवानगी देण्यात यावी.डॉ.बाबासाहेब आंबेडक जयंती असल्यामूळे १४ एपिंल पुर्वी सर्व सफाई मजुराचे कर्मचा-याचे पेमेंट करण्यात यावेत अशी मागणी आहे. |
| **सरजितसिंघ गिल** | सभागृह नेते विरेंद्रसिघ गाडीवाले, विरोधी पक्ष नेत दिपकसिंह रावत यांनी शासनाने माझी गुरुव्दारा बोर्डाचे सदस्यपदी निवड केल्याबद्दल अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला त्याबद्दल मी त्यांचे अभार मानतो. तसेच सभागृहानी अभिनंदनाचा ठराव एकमताने पास केला त्याबद्दल सर्व स.सदस्यांचे व महापौर श्री अब्दुल सत्तार यांचे अभार मानतो. गुरुव्दारा धार्मीक बोर्डावर माझी जी नियुक्ती झालेली आहे. ती राजकीय व्यक्ती म्हणुन झालेली नसुन मी यापुर्वी गुरुव्दारा धार्मीक बोर्डावर केलेल्या कामाच्या अनुभवावर, सामाजिक व धार्मीक कार्यामुळे झालेले आहे. माझी नियुक्ती करण्यासाठी माजी खासदार श्री भास्कररावजी पाटील खतगावकर, भाजपचे प्रदेश अध्यक्ष खासदार श्री रावसाहेबजी दानवे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेद्रजी फडणवीस यांच्याकडे शिफारस केली होती. त्यानुसार माझी निवड झालेली आहे. त्याबद्दल मी श्री भास्कररावजी पाटील खतगावकर, भाजपचे प्रदेश अध्यक्ष खासदार श्री रावसाहेबजी दानवे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेद्रजी फडणवीस यांचे अभार मानतो. तसेच या सभागृहास अश्वासन देतो की मी गुरुव्दारा बोर्ड व महानगरपालिका यांचा दुवा म्हणुन काम करीन महानगरपालकेचे जे प्रश्न आहेत ते गुरुव्दारा बोर्डापुढे मांडीन व गुरुव्दारा बोर्डाचे जे प्रश्न आहेत ते महानगरपालिकेपुढे मांडेल. |
| **उमेश चव्हाण** | बीएसयुपी घराचे बांधकामासाठी गुरुव्दाराची जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी श्री सरजितसिंघ गिल यांनी प्रयत्न करावेत. |
| **अशोक उमरेकर** | वजिराबाद भागात सदनिकेमध्ये अनेक वर्षापासुन लोक राहतात. त्यांचेकडून त्यांच्या सदनिका अनाधिकृत आहे म्हणुन सुडबुध्दीने हार्डशिप प्रिमियम योजनेअंतर्गत दंड वसुल करुन विनाकारण त्यांना त्रास देण्यात येत आहे. ज्यांनी त्यांचे विरुध्दात तक्रार केली त्यांचे घरचे बांधकामसुध्दा अनाधिकृतपणे झालेले आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्दही कार्य करण्यात यावे. |
| **ललिता बोकारे शिंदे** | प्रभाग क्र.38 व 39 मध्ये मोठया प्रमाणात मोकळया जागा असुन त्या जागेत व्यायामशाळा, उद्यान विकसीत करण्यात यावे. तसेच प्रभाग क्र.39 मध्ये एन डी-41 येथील मोकळया जागेत फंन्क्शन हॉलचे बांधकाम करण्यात यावे. याकरिता अंदाज पत्रकात तरतुद करण्यात यावी. श्री विनय पाटील सभापती स्थायी समिती सभापती यांनी शिवजयंती निमित्य सांस्कृतीक कार्यक्रम व व्याख्यानमालेचे आयोजनासाठी रु.३ लक्षची तरतुद केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. |
| **विनय गुर्रम** | प्रभागात होत असलेल्या अनाधिकृत बांधकामाविरुध्द कार्यवाही करण्यासाठी इमारत निरिक्षक आणि, अनाधिकृत बांधकामाचे विभाग प्रमुख श्री अटकोरे यांचेकडे वारंवार तक्रार करुन ही ते कार्यवाही करीत नाहीत. |
| **डॉ.करुणा जमदाडे** | मागील सभेत लातुर रस्ता डॉ.बाबासाहेब आंबेडर चौकाचे सुशोभिकरण करुन त्याठिकाणी अशोकस्तंभ उभारण्यासाठी प्रस्ताव मांडला होता. तेव्हा या कामासाठी १ कोटीची तरतुद करण्यात आली होती परंतु अद्याप काम झालेले नाही करीता संबंधित अधिका-याना आदेश देवुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण अशोकस्तंभ उभारण्याचे काम त्वरीत पुर्ण करावे. संबंधित अधिका-यांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा करण्यात यावा. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | स.सदस्यांनी अनाधिकृत बांधकामासंदर्भात प्रश्न विचारलेले आहेत. श्री नवल पोकर्णा यांनी ही चतुर्थश्रेणी कर्मचा-यांनी अनाधिकृत बांधकामाविरुध्द कार्यवाही न करण्यासाठी रु.५० हजार घेतल्याचा आरोप केलेला आहे. महानगरपालिकेने डी.सी.रुलला मान्यता दिली असुन त्यानुसार अनाधिकृत बांधकामावर दंडात्मक कार्यवाही व्हावयास पाहिजे. ईमारत निरिक्षक हप्ता घेवुन अनाधिकृत बांधकामाविरुध्द कार्यवाही करीत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यांना सक्त ताकिद देण्यात यावी यापुढे असे प्रकार होवु नये. |

**रामनारायणजी काबरा** नांदेड शहरांकरीता एफएसआय वाढवुन देण्यासाठी महासभेने ठराव पारीत केलेला आहे तो शासनास सादर करण्यात आला किंवा नाही. शासन इतर शहरांना एफएसआय वाढवुन देत आहे. आपल्याही शहराला एफएसआय वाढवुन दिला तर लोकांची अनाधिकृत बांधकाम करण्याची प्रवृत्ती कमी होईल.

**नवलकुमार पोकर्णा** अण्णाभाऊ चौक ते आयटीआय या रस्त्याच्या दोन्ही बाजुनी २०० दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्यामुळे अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली परंतु अतिक्रमण हटाव पथकातील कर्मचा-यांनी अतिक्रमण हटविले नसल्यामुळे या पथकातील कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

**आयुक्त** अनाधिकृत बांधकामाविरुध्द कार्यवाही करण्यासाठी एक महिण्याचा अवधी देण्यात यावा. अतिक्रमण हटविण्यासाठी एक विशेष पोलीस पथकासह भरारी पथकाची स्थापना करुन चालु असलेली अनाधिकृत बांधकामे वेळीच थांबविण्यात येतील. अनाधिकृत इमारतीचा विकास होवु दिला जाणार नाही.

**विषय क्र. 1**

मु.प्रां.महनपा अधिनियम 1949 चे कलम 95 च्या अधिन राहून स्थायी समितीने सादर केलेले सालसन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रक मंजुर करणे बाबत.

**विनय पाटील सभापती** सालसन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यासाठी स्थायी समितीने शिफारस केली आहे तसेच सालसन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रकात स्थायी समितीने आवश्यक ते फेरफार व दुरुस्त्या करुन मान्यतेसाठी सादर केलेले आहे, त्यास सभागृहाने मान्यता द्यावी. तसेच अर्थसंकल्पावर मी माझे मनोगत वाचुन दाखवित आहे.

**(श्री विनय गिरडे पाटील , सभापती, स्थायी समिती ,यांनी आपले मनोगत सभागृहात वाचून दाखविले.)**

**दिपकसिंह रावत** श्री विनय गिरडे पाटील , सभापती, स्थायी समिती, यांनी आताच स्थायी समितीने मान्यतेसाठी शिफारस केलेले महानगरपालिकेचे सालसन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रकसभागृहासमोर सादर केले आहे त्याबध्दल मी त्याचे अभिनंदन करतो. सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी स.सदस्यांना आठ दिवसाचा कालावधी देणे आवश्यक आहे.त्यामूळे आजची विशेष सभा आठ दिवसाकरीता तहकुब करण्यात यावी.जेण्े करुन स.सदस्य अर्थसंल्पावर अभ्यास करुन योग्य त्या तरतूदी करण्याकरीता शिफारस करु शकतील.

**सरजितसिंघ गिल** श्री दिपकसिंह रावत यांनी अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी स.सदस्यांना (8) दिवसाचा अवधी देण्यात यावा तो पर्यत विशेष सभा तहकुब करण्यात यावी असा प्रस्ताव मांडला आहे त्यास माझे अनुमोदन आहे. आठ दिवसाकरीता सभा तहकुब करण्यात यावी.

**अंजली गायकवाड** मागील सभेत एक प्रस्ताव होता की..लातुर रस्त्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चोकात मा.शंकररावजी चव्हाण कमान करणे बाबत .त्याप्रस्तावाला एक जागा आरक्षित असतांना दुसरे काम होवू शकत नाही व कमाणीसाठी विरोध पण नाही. अगोदर आरक्षित जागेत कमान करता येते का म्हणून संविधान व एमआयएम च्या वतीने निदर्शने केली होती. तेव्हा महापौर श्री अ.सत्तार यांनी तेथे एक कोटी खर्च करुन पुर्णाकृती पुतळा व परिसर सुशोभिकरण करण्याची जिम्मेदारी धेतली होती ती अद्याप पावेतो पुर्ण झाली नाही आणि एका प्रस्तावाला सुचक व अनुमोदक असतांना पुन्हा या कामाला अनुमोदन देता येते काय हा मुध्दा फक्त संविधान व एमआयएमच्यावतीने उचलला होता व तेच सत्य आहे.

**प्रा.ललिता बोकारे शिंदे** कै.डॉ.शंकरराव चव्हाण प्रवेशव्दार बांधण्याचा प्रस्ताव सिडको येथील प्रियदर्शनी महिला प्रतिष्ठानच्यावतीने तत्कालिन सिडको प्रशासनास सादर केला होता. सन २००८ साली या प्रवेशव्दाराचे भूमिपुजन झाले ती जागा सध्याची सिडको येथील मोंढा जेथून सुरु होतो तेथे कॅन्सर हॉस्पीटलच्या समोर आहे. जळपास ८ वर्षापुर्वी ती जागा निश्चित असून घटनेचे शिल्पकार डॉ.,बाबासाहेब आंबेडकर लातूर चौकाच्या ठिकाणी नाही. याची नोंद घेण्यात यावी.

**महापौर** स.सदस्यांना अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी आठ दिवसाचा कालावधी देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आजची अर्थसंकल्पीय विशेष सभा मंगळवार दि.३१.३.२०१५ पर्यत तहकुब करण्यात येते.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड |